# गोकुळींच्या सुखा, अंतपार नाही लेखा

सौ.शुभदा महाजनी

श्रावण कृष्ण अष्टमी, श्रीशके १९३०; दिनांक २३ ऑगस्ट २००८ रोजी, भगवान श्रीकृष्ण-जन्माष्टमी महोत्सव श्रीक्षेत्र आंबेरी येथे संपन्न झाला. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, कऱ्हाड, बेळगांव, गोवा अशा अनेक ठिकाणांहून साधक-सद्भक्तमंडळी आली होती. दुपारी कुडाळ येथे मुक्कामी ताजेतवाने होऊन, संध्याकाळपासून सुरू होणाऱ्या श्रीकृष्ण-जन्माष्टमीच्या कार्यक्रमांसाठी सर्वजण श्रीक्षेत्र आंबेरी येथील भगवान श्रीकृष्ण मंदिरात पोहोचले.

मनमोहन अशा मुरलीधर श्रीभगवंतांचे आणि उभय श्रीसद्गुरुमहाराजांचे डोळेभरून दर्शन घेऊन, पुढील कार्यक्रमासाठी सर्वजण सभागृहात आसनस्थ झाले. मंदिरावर रंगीबेरंगी विद्युत रोषणाई केली होती. प्रत्येक खिडकीत उत्कृष्ट पुष्परचना केल्या होत्या. वातावरणात अतीव आनंद, उत्साह व सुगंध दाटला होता.

संध्याकाळी ७.०० वाजता, कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री.विजय उपाध्ये यांनी संवादिनीवर सुरांशी लडिवाळ, सहज-संवाद साधून, **'हे करुणाकरा ईश्वरा'**, **'समाधी साधन संजीवन नाम ।'**, **'नामाचा गजर'**, **'गुरु परमात्मा परेशु ।'**, **'राधाधर मधुमिलिंद जयजय ।'** इत्यादी अभंग साक्षात् बोलके केले. त्यानंतर श्री.मनोज भांडवलकर यांचे पखवाज-वादन झाले. त्यांनी सोळा मात्रांचा त्रिताल वाजवून अतीव सुंदर पखवाज-वादनसेवा सादर केली. त्यांना तालवाद्यावर श्री.निशिकांत जोशी व श्री.शशांक लिमये यांनी साथ केली.

प.पू.सद्गुरु सौ.ताईंच्या ज्येष्ठ स्नुषा सौ.अमिता आगटे, ह्यांनी देखील यावेळी **'राधाधर मधुमिलिंद जयजय'**, **'निर्गुणाचा संग'**, **'अबीर गुलाल'**, **'निसदिन बसरत नैन हमारे ।'** असे अतिशय सुंदर अभंग गाऊन, अतिशय भावपूर्ण व श्रवणमधुर अशी गायनसेवा श्रीभगवंतांच्या चरणी रुजू केली. त्यांना संवादिनीवर श्री.विजय उपाध्ये, पखवाजावर श्री.मनोज भांडवलकर आणि तालवाद्यावर श्री.राहुल कुलकर्णी यांनी साथ केली. श्रीभगवच्चरणी सेवा सादर करणाऱ्या सर्व कलाकारांना प.पू.श्री.दादांच्या हस्ते शाल व श्रीफळप्रसाद देण्यात आला.

अल्पोपाहारानंतर, श्री.अनिरुद्ध देशपांडे यांनी **'घनघमंड नभ गरजत घोरा'**, **'करूँ मन नंदनंदन को ध्यान'**, **'जय जय रामकृष्णहरी'**, **'नवनीरजसम नवनीतप्रिय नवलविनोदविहारी'**, **'झाला प्रातःकाळ स्मराया गोविंद'**, **'पंढरीच्या विटेवरी'**, **'कशी जाऊ मी वृंदावना'**, **'समर्थांची धून पडो माझ्या श्रवणी'** इत्यादी विविध अभंग गाऊन बहारदार गायनसेवा रुजू केली.

त्यानंतर सौ.शुभदाताई देशपांडे यांची सतारवादन-सेवा झाली. त्यांनी जोगकंस रागातील त्रितालात निबद्ध बंदिशीचे, विलंबित व द्रुत लयीत सतारवादन केले. त्यांना पखवाजावर श्री.मनोज भांडवलकर यांनी सुंदर साथ केली. या अतीव सुंदर अशा गायन आणि वादनसेवेबद्दल, श्री.अनिरुद्ध देशपांडे व सौ.शुभदाताई देशपांडे यांना प.पू.सद्गुरु सौ.ताईंच्या हस्ते शाल व श्रीफळप्रसाद देण्यात आला.

रात्री ११.०० वाजता, सर्व साधकजन आतुर, आनंदोत्सुक होऊन ज्या कार्यक्रमाची प्रतीक्षा करीत होते, त्या श्रीभगवंतांच्या जन्मकालाच्या प्रवचनसेवेला प.पू.सद्गुरु श्री.दादांनी सुरुवात केली. **'गोकुळींच्या सुखा । अंतपार नाही लेखा ॥'**, **'नंदाच्या घराला । मज नेई गोकुळाला ॥'**, **'नंदमुकुंद मुरारी सावळा ।'** या अभंगांच्या आधारे कथाप्रसंग मूर्तरूपे साकार करत, प.पू.श्री.दादांनी भगवान श्रीकृष्णांची जन्मकथा यावेळी सांगितली. या कथेच्या श्रवणाचे लाभ सांगताना ते म्हणाले की; ''प्रत्यक्ष भगवत्प्राप्ती हेच याचे फळ आहे. भगवद्-लीलावर्णन हे सर्व शास्त्रांचे सार आहे. भक्तीच्या योगेच जीवांचा उद्धार होतो.''

जन्मकाळाच्या वेळी, प.पू.सद्गुरु सौ.ताईंनी उष्णोदक स्नान घालून,

नूतन वस्त्रालंकार व विविध पुष्पे अर्पण करून बालभगवंतांचे पूजन केले. त्यानंतर आरती होऊन सर्वांनी तीर्थप्रसाद घेतला आणि सर्वजण अतीव हर्षोल्लासात कुडाळ-मुक्कामी परतले.

दुसऱ्या दिवशी रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी, अल्पोपाहारानंतर सकाळी ९.३० वाजता, प.पू.सद्‌गुरु श्री.दादांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत काल्याच्या कीर्तनाला सुरुवात केली. **'उपजोनियां पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ॥'** हा श्रीसंत तुकाराम महाराजांचा अभंग त्यांनी कीर्तनसेवेसाठी घेतला होता. श्रीसंत तुकाराम महाराजांच्याच, **'आम्ही हरीचे सवंगडें ।'**, **'कवळांचिया सुखें ।'**, **'माझे गडी कोण कोण ।'**, **'काम सारूनी सकळ ।'**, **'आजि ओस अमरावती ।'**, **'घ्या रे भोंकरें भाकरी ।'**, **'गडी गेले रडी ।'**, **'हेचि अनुवाद सदा सर्वकाळ ।'**, **'इहलोकींचा हा देहे ।'**, **'ब्रह्मादिकां न कळे खोळ ।'** आणि श्रीसंत भानुदास महाराजांचा **'वृंदावनी वेणु कवणाचा माये वाजे ।'** या अभंगांच्या आधारे, प.पू.श्री.दादांनी काल्याची लीला प्रत्यक्ष चक्षुगोचर केली. श्रीभगवंत, त्यांचे सवंगडी, त्यांचे खेळ, नाट्य व त्यातील आनंदरस त्यांनी उपस्थितांच्या अनुभवास आणून दिला. यावेळी, **'पाहतां पाहतां मना न पुरेचि धणी ।'** अशीच सर्वांची अवस्था झाली होती. याच आनंदाच्या भरात त्यांनी काल्याचे गुह्य व भक्तीचे रहस्य आपल्या अमृतरसपूर्ण अशा कीर्तनातून प्रकट केले.

ते म्हणाले; ''श्रीमद् भागवताच्या दशम स्कंधातील तेराव्या अध्यायात आलेली, अघासुराच्या वधानंतर वनभोजनाच्या वेळी झालेली अशी ही काल्याची लीला आहे. 'अघासुर' म्हणजे मूर्तिमंत पाप. पापाचा संपूर्ण नाश झाल्याशिवाय श्रीभगवंतांशी खेळायचा अधिकार प्राप्त होत नाही. श्रीभगवंत स्वतःच आपले गडी निवडतात. घाबरट, भेकड, साधनेचा वीट व नामस्मरणाचा आळस असलेली मंडळी त्यांना आवडत नाहीत. श्रीभगवंतांपाशी त्यांच्याच अटींवर नांदावे लागते. 'काला' म्हणजे 'परमात्म्याशी जीवाचे लग्न !' हा जीव-शिवाचा खेळ आहे. श्रीसद्‌गुरूंची, श्रीभगवंतांची कृपा होत नाही, तोवर काल्याचा प्रसाद मिळत नाही.

काला होण्यासाठी यमुना, वाळवंट व सोबतची शिदोरी आवश्यक आहे. 'वाळवंट' म्हणजे वैराग्ययुक्त अंतःकरण, 'यमुना' म्हणजे दृढ भक्ती आहे. 'भोकरे' म्हणजे लोणची व भाकरी हे कर्म, 'भात' म्हणजे प्राण, 'दही' म्हणजे धैर्य, चिकाटी; आणि 'नवनीत' म्हणजे सात्त्विक श्रद्धा होय ! तीही 'माये'ला म्हणजे अविद्येला चोरून आणावी लागते. जोवर मायेचा निरास होत नाही, तोवर श्रद्धा दृढ होत नाही. 'ताक' म्हणजे आळस, निद्रा, संशय; ते सांडावे, दूर करावे !''

अतिमधुर, अवीट गोडीच्या या काल्याच्या कीर्तनाच्या वेळी, गोपाळांचे खेळही सादर झाले. त्यानंतर बालभगवंतांनी दहीहंडी फोडल्यावर, गोपाळांनी काला केला. या काल्याच्या अतीव गोडीच्या प्रसादाचा व महाप्रसादाचा लाभ सर्वांनी घेतला.

संध्याकाळी ५.०० वाजता, श्रीहरिपाठ-गायनसेवा झाली. त्यानंतर संध्याकाळी ७.०० वाजता, वेदमंत्रांच्या उद्‌घोषात श्रीभगवंतांच्या राजोपचार-पूजेला प्रारंभ झाला. यावेळी षोडशोपचार पूजेबरोबरच शास्त्रसेवा, व्याकरणसेवा, अष्टकसेवा, चामरसेवा, नृत्य व गायनसेवा, वादनसेवा, नामजप-सेवा अशा विविध सेवाही प्रेमभावे श्रीभगवंतांच्या श्रीचरणी रुजू करण्यात आल्या. या राजोपचार पूजेसाठी विविध क्षेत्रांहून पाचारित केलेल्या वेदमूर्तींना प.पू.सद्‌गुरु सौ.ताईंनी सन्मानपूर्वक वस्त्र, श्रीफळ व दक्षिणा समर्पित केली. या राजोपचार-पूजेने ह्या अनुपमसुंदर सोहळ्याची सांगता झाली.

श्रीभगवंतांचे, राजाधिराज सद्‌गुरु श्रीअक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांचे व प.प.श्री.थोरल्या महाराजांचे दर्शन व तीर्थप्रसादाचा लाभ घेऊन, झालेला हा दोन दिवसांचा सर्वांगसुंदर सोहळा हृदयी साठवून, सर्वजण तृप्त मनाने आपापल्या मुक्कामी परतले.

□□